दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १५२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.३१ ऑगस्ट २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पोलादपूरमध्ये इर्टिगा-शिवशाही धडक ; २ ठार ३ जखमी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पुर्वे कडील सर्व्हिसरोडवरून पश्चिमेकडे असलेल्या मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर जाण्यासाठी क्रॉसिंगची सुविधा नसल्याने मुंबईकडे रिकामी चाललेली शिवशाही बस आणि कोकणाकडे चाललेल्या इर्टिगा कारची समोरासमोर टक्कर होऊन झालेल्या अपघा- तात दोन पुरूष ठार झाले असून अन्य तीन जखमी प्रवाशांवर कामोठे येथील महात्मा गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.



मुंबई गोवा महामार्गावर पोलादपूर येथे ग्रामीण रुग्णालयापासून काही अंतरावर दोन सर्व्हिस रोड आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दोन मार्गिका यादरम्यान जिथे सर्वच वाहनचालकांचा गोंधळ उडतो. त्या स्टेट बँक ऑफ इंडिया

…/२

## लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने मानले मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आभार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्रांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने मुंबईत सदिच्छा भेट घेऊन आभार मानले.

नवी मुंबईच्या विकासात असलेले लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि स्थानिकांच्या विविध संघटनांची मागणी विच- ारात घेता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ असे करण्यास जुलैमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान नामकरणाचा ठराव विधानसभा आणि विधान परिषदेत मंजूर करण्यात आला. लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावासाठी सर्वपक्षीय कृती समितीने व्यापक लढा उभारून आंदोलने केली. त्यास ज्यांनी ज्यांनी

…/२

### गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणीत करण्याकरिता...

## सिडकोतर्फे ४१५८ सदनिकांसह २४५ वाणिज्यिक गाळे, ६ कार्यालये आणि विविध वापरांसाठी भूखंड विक्रीची योजना

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

देशाचे मा. पंतप्रधान यांच्या संकल्पनेनुसार, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सर्वांसाठी घरे मिशन अंतर्गत समान संधी निर्माण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली PMAY योजनेअंतर्गत परवडणारी घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी सिडको महामंडळातर्फे, गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोच्या विविध गृहसंकुलांतील उपलब्ध ४,१५८ घरांसोबतच २४५ वाणिज्यिक गाळे, रेल्वे स्थानक संकुलांतील ६ कार्यालये व त्याचप्रमाणे विविध वापरांसाठी भूखंड विक्रीच्या योजना सादर करण्यात आल्या आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह व्यापारी, व्यावसायिक अशा समाजातील विविध घटकांचा गणेशोत्सवाचा आनंद निश्चितच द्विगुणीत होणार




आहे. डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या नेतृत्वाखाली, सिडको सातत्याने घरे, भूखंड, दुकाने आणि कार्यालयांची (कमर्शियल प्रीमाईसेस) विविध योजनांद्वारे समाजातील सर्व घटकांना विक्री करते. ज्यामुळे शहराच्या आर्थिक विकासात मदत होण्यासोबतच नवी मुंबईच्या वाणिज्यिक क्षमता वृद्धिंगत होऊन शहराच्या आर्थिक विकासासही हातभार लागतो.

…/२






# स्थित्यंतराचे पाऊल

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लाभलेला काँग्रेस पक्ष सध्या कधी नव्हे एवढ्या कसोटीच्या क्षणांमधून जात आहे. सत्ताकेंद्रांच्या घटत्या क्रमवारीने नेतृत्व चिंतित झाले असताना, सक्षम नेतृत्वाअभावी सामान्य कार्यकर्तेही सैरभैर आहेत. निग्रही नेत्याच्या समयोचित निर्णयक्षमतेतून सुदृढ राजकारणाचा पाया रचला जातो. केंद्रीय सत्ता खाली खेचणारा अचाट पराक्रम कार्यकर्त्यांकडून अपेक्षित असेल, तर पक्षाला नवसंजीवनी देणारा सेनानी काँग्रेसला शोधावाच लागेल. सन २०२४मध्ये होणारी लोकसभा निवडणूक घराणेशाहीच्या मुद्द्यावर लढविली जाईल, असे थेट संकेत भारतीय जनता पक्षाने दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावर झालेल्या भाषणात चक्क या मुद्याला स्थान दिले. सोनिया गांधींकडील हंगामी अध्यक्षपदच स्थायी होत चालल्याचे चित्र होते. ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांच्या राजीनाम्याने हादरलेल्या पक्षाने अखेर कार्यकारिणीच्या बैठकीत निवडणुकीची तारीख जाहीर केली. पक्षामधील २३ दिग्गजांनी वेळोवेळी गंभीर नाराजी व्यक्त केल्यानंतरही पूर्णकालीन अध्यक्षपदाचा मुद्दा एवढा का डावलला जातो, याबद्दलचा संताप तळागाळातून व्यक्त होत होता. नरेंद्र मोदी यांच्या रूपात भाजपने काँग्रेसपुढे मोठे आव्हान उभे केले. त्यांच्याविरोधात जनमानसाला हात घालायचा असल्यास, आधी काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण करावे लागेल. सध्या सोनिया गांधी याची प्रकृती देशव्यापी दौरे करण्याजोगी नाही. पक्षाध्यक्षपदात रुची नसल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले आहे. अपयशाचे खापर वारंवार माथी घेतल्याने, गांधी घराण्याबाहेरचा उमेदवार देऊन सोक्षमोक्ष लावून टाकण्याची त्यांची भूमिका दिसते. प्रियांका गांधींभोवती उत्तर प्रदेशाचे कुंपण घालून पक्षानेच त्यांच्या कार्यकक्षा सीमित केल्या. गैरगांधी उमेदवारांचे कर्तृत्व आजवर निम्न दर्जाचे ठरले, अशी काँग्रेसची अवस्था निश्चितच नाही. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५च्या मुंबईच्या पहिल्या अधिवेशनात झाली; तेव्हापासून गांधी घराणेतर अध्यक्षांचीच संख्या अधिक आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हाही अध्यक्षपद नेहरू-गांधी परिवाराकडे नव्हते. आचार्य कृपलानींकडे तेव्हा पक्षधुरा होती. अर्थात, उदाहरण म्हणून आजवरच्या अध्यक्षांपैकी बिशन नारायण दार, नवाब सय्यद महमंद बहादूर, सत्येंद्र प्रसन्न सिन्हा, अंबिका चरण मजूमदार यांसारख्या अलक्षित थोरांची कारकिर्द सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कोणते प्रयत्न काँग्रेसने केले, हा प्रश्न अंतर्मुख करणारा आहे. सीताराम केसरींनंतरच्या सलग २४ वर्षांत काँग्रेसला गांधीछत्राची सवय झाली आहे. अशा स्थितीत राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे नाव सातत्याने पुढे येत आहे. राहुल गांधी प्रचाराची धुरा सांभाळतील आणि संघटनेकडे गेहलोत लक्ष देतील, अशी उपाययोजना असू शकते. गेहलोत हे इंदिरा, राजीव आणि राहुल अशा गांधींच्या तिन्ही पिढ्यांचा विश्वास जिंकणारे नेते आहेत. सलग तीनदा राजस्थानचे मुख्यमंत्रिपद; तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे. फटकळ नेत्यांचा त्यांना सामना करावा लागेल. गांधी कुटुंबाला चालणारा 'मोहरा' म्हणून गेहलोत यांचे नाव अध्यक्षपदासाठी स्वीकृत झाले, तरी गांधी घराण्याची अघोषित सत्ता पक्षावर कायम राहण्याचीच शक्यता आहे. राजस्थानच्या मुख्यमंत्रिपदावरून पायउतार होणे, हे गहलोत यांच्यासारख्या मुरब्बी आणि महत्त्वाकांक्षी नेत्यासाठी कितपत योग्य ठरेल, याचाही विचार होईल. सचिन पायलट यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची सूत्रे सोपविणे त्यांना जड जाईल. त्यांना डावलल्यास तेथून रोष उद्भवण्याचा धोका राहील. जयराम रमेश, मुकुल वासनिक, पी. चिदंबरम, मल्लिकार्जुन खरगे वा भूपेश बघेल यांना देशव्यापी स्वीकारार्हता नाही. मुकुल वासनिक यांच्या महाराष्ट्रव्यापी 'दबदब्या'तून ही चाचणी घेता येईल. गांधी कुटुंबाखेरीज देशस्तरीय स्वीकृतीसाठी अतोनात परिश्रमांची गरज लागेल. अन्य व्यक्तीला पद देणार नाही, तोपर्यंत ते नाव रुजणारही नाही. अनेक वर्षांनंतर होणाऱ्या निवडणुकीचा निकाल कुणाच्याही बाजूने गेला, तरी नव्या अध्यक्षांची वाटचाल सोपी नसेल. गांधी घराण्याचे अघोषित सत्ताकेंद्र सांभाळण्याची कसरत नव्या अध्यक्षांना करावी लागेल. मुख्य म्हणजे, त्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असेल. निवडणुकांनंतर २०२७पर्यंत नेटाने काम करणाऱ्या आणि करवून घेणाऱ्या नेतृत्वाचा विजय काँग्रेसला हवा आहे. सन १९७७मधील जनता पक्ष आजही आहे; मात्र अस्तित्वाचा घरंगळ लपलेला नाही. अरविंद केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची चौकट वाढवली. बंगालच्या बाहेरही ममता बॅनर्जींची छाप उमटली. अल्प संख्याबळात सत्ताबदल करणाऱ्या नितीशकुमारांचे नाव केंद्रातील विरोधी नेतृत्वासाठी घेतले जाणे, हे काँग्रेसची ऐतिहासिक घसरण स्पष्ट करणारे आहे. अशा स्थितीत काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक होत आहे. स्थित्यंतराचे सकारात्मक पाऊल म्हणून त्याकडे नक्कीच बघता येईल.

# सायकल मोहीम करणाऱ्या सायकलस्वाराचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कर्जत सायकल प्रेमी तर्फे श्रीनगर ते लेह-लडाख अशी अतिउंचीवरील सायकल मोहीम यशस्वी करणाऱ्या सायकलस्वारांचा कर्जत नगरपरिषद तर्फे सन्मानचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त श्रीनगर (जम्मू काश्मीर राज्य) ते लेह लडाख अशा अतिउंचीवरील प्रदेशात ४४५ किलोमीटर सायकल चालवून ही मोहीम पूर्ण केली. या मोहिमेचा त्यांचा मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १ वरून होता,या सायकल मोहिमेत अतिउंचीवरील विरळ हवामानात १० हजार फूटांपेक्षा जास्त उंचीवर जेथे ऑक्सिजनचे प्रमाण कमी असते, असे जोझिला पास ११ हजार ५५७ फूट, नमीकला पास १२ हजार १३९ फूट, फोटूला पास १३ हजार ४७९ फूट हे ३ पॉईंट्स पाऊस पडत असताना बोचऱ्या थंडीत व काही वेळेस रणरणत्या उन्हात ३७ अंश डिग्री सेल्सिअस तापमान असताना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पार केले.

या सायकलस्वारांनी द्रास आणि कारगिल येथे असलेल्या कारगिल वॉर मेमोरियललाही भेट दिली व १९९९ मध्ये शहीद झालेल्या भारतीय जवानांना मानवंदना दिली. या मोहिमेत ७ सायकलस्वार सहभागी झाले होते व मदतनीस म्हणून ३ सदस्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. सायकलस्वारांमध्ये सायकल मोहिमेचे पथकप्रमुख प्रकाश पटवर्धन, श्रीराम फाटक, हितेन राणे, किशोर साळवी, अमित मोने, श्रीरंग जोशी व अमित गुरव सहभागी झाले होते, तर मदतनीस व छायाचित्रकार म्हणून विशाल गायकवाड, भावेश ठक्कर व गौरव फाटक यांनी अतिशय मोलाची कामगिरी केली . याचबरोबर लेह येथील जगातील सर्वात उंच रस्ता म्हणजेच खारदुंगला पास १८ हजार ३८० फूट या ठिकाणी सायकल मोहिमेतील श्रीरंग जोशी व किशोर साळवी हे सायकलस्वार अतिशय खडतर वातावरणात येथे सायकलवर पोहोचण्यात यशस्वी झाले व त्यांनी तेथे भारतीय तिरंगा ध्वज फडकवला.

या सायकलस्वारांचा कर्जत नगरपरिषदेतर्फे सन्मान आयोजित करण्यात आला होता, सायकलस्वारांचे प्रतिनिधी म्हणून प्रकाश पटवर्धन यांना नगराध्यक्ष सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले, याप्रसंगी नगरसेविका वैशाली मोरे, संचिता पाटील विशाखा जिनगरे, स्वामिनी मांजरे, सुवर्णा निलधे, भारती पालकर नगर-सेवक उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, शिवशंभो चे विकास चित्ते, नगरपरिषद कर्मचारी रविंद्र लाड, सुदाम म्हसे उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : तुर्भे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तुर्भे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| तुर्भे | सुनील दिनकर पाटील | ५०/१/अ/२ब | ०-६५-१० पो.ख. ०-०३-६० एकूण क्षेत्र ०-६८-७० | ६.४६ |
| | एकूण विक्री करावयाचे क्षेत्र | | ०-३१-०० (३१ गुंठे) | |

सदरहू वर ही जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्षा तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.३०/०८/२०२२

**सही/-**
**ॲड.महेश भगत**
**पत्ता : शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८६५५१५८७८१**

# पनवेल येथे एच.आय.व्ही. संक्रमित महिलांसाठी संमेलन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आधार विहान प्रकल्प, पनवेल यांच्या वतीने व युनायटेड वे इंडियाच्या सह्योगाने, पंचायत समिती हॉल, पनवेल येथे (दि.२६ ऑगस्ट) रोजी एच.आय.व्ही. संक्रमित महिलांसाठी संमेलन आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कार्यक्रम अधिकारी, रायगड जिल्हा, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था संजय माने, पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, वैद्यकीय अधिकारी, धीरूभाई अंबानी ए.आर.टी सेंटर,पनवेल डॉ.पर्णा बारडोलोई, समोपदेशक, धीरूभाई अंबानी ए.आर.टी. सेंटर,पनवेल, समोपदेशक, आय.सी.टी.सी.सेंटर, पनवेल, सौ. तारा इंगळे, श्री. विकास कोंपले, प्रकल्प संचालक, विहान प्रकल्प, पनवेल, दिलीप विचारे, अध्यक्ष, आधार संस्था सौ. श्रद्धा जाधव, वरिष्ठ अधिकारी, युनायटेड वे इंडिया जुही जस्व-ाणी आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रकल्प व्यवस्थापक, आधार विहान प्रकल्प, पनवेल सुनील पटेल यांनी विहान प्रकल्पाबद्दल थोडक्यात माहिती दिली व आजपर्यंत केलेल्या कामाचा लेखाजोखा प्रमुख अतिथींसमोर मांडला. त्यानंतर या कार्यक्रमात प्रमुख अतिथींनी आपले विचार व्यक्त केले.

वैद्यकीय अधिकारी, धीरूभाई अंबानी ए. आर. टी. सेंटर पनवेल डॉ.पर्णा बारडोलोई यांनी एच. आय. व्ही बाधित व्यक्तींचा औषधोपचार व पोषक आहाराविषयी चर्चा केली. नियमित सांगितलेल्या वेळेवर ए.आर.टी.च्या गोळ्या घेतल्या व योग्य पोषक आहार घेतला तर CD4 वाढते व वायरल लोड सुद्धा कमी होते त्यामुळे संक्रमित व्यक्ती ही सामान्य जीवन जगू शकतो व त्याबद्दलची विशेष काळजी आधार विहान प्रकल्प व ए. आर. टी. सेंटर घेत आहे,असे सांगितले.

गटविकास अधिकारी संजय भोये यांनी उपस्थितांना महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत माहिती दिली.त्यामध्ये विशेष म्हणजे दुर्धर आजार पीडित महिलांसाठी विशेष बचतगट व अनेक प्रकारचे लघु उद्योग व त्यासाठी लागणारे प्रशिक्षण यासंबंधीचा समावेश होता. त्यांनी आधार विहान प्रकल्पाचे व्यवस्थापक सुनील पटेल यांना सांगितले की, ग्रामीण विभागातील ज्या बाधित महिलांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येईल त्यासाठी पंचायत समिती आधार विहान प्रकल्प ला सर्वोतोपरी मदत करेल.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. संजय माने यांनी उपस्थित महिलांना आश्वस्त केले की, एच. आय.व्ही. बाधित व्यक्तींना शासकीय योजना घेत असताना काही अडचणी आल्या तर त्याचे लवकरात लवकर निरसन करून त्याचा लाभ त्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात येईल. यावेळी त्यांनी आधार विहान प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांचे रायगड जिल्ह्यातील एच.आय. व्ही. बाधित लोकांसाठी कोविड काळात केलेल्या कामाबद्दल विशेष कौतुक केले. सगळीकडे लॉकडाऊन असूनही जिल्ह्यातील खेडोपाड्यात एच.आय.व्ही.बाधित रुग्णांना घरपोच औषध उपलब्ध करून दिले व आधार विहान प्रकल्पाला जिल्हा स्तराहून सर्वोतोपरी मदत करण्यात येईल,असे आश्वासन दिले.

या कार्यक्रमात काही संक्रमित महिलांनी आपले अनुभव कथन केले. शेवटी युनायटेड वे इंडिया तर्फे जुही जस्वाणी यांच्या हस्ते उपस्थित महिलांना हायजेनिक मेडिकल किटचे वाटप करण्यात आले.

### उद्या अंक नाही

**दै.रायगड नगरीच्या कार्यालयाला गणेश चतुर्थीनिमित्त ३१ ऑगस्ट २०२२ रोजी सुट्टी असल्यामुळे दि.०१ सप्टेंबर २०२२ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची जाहिरातदार, वाचकांनी व वितरकांनी नोंद घ्यावी.**

**- व्यवस्थापक**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूरमध्ये इर्टिगा-शिवशाही धडक ; २ ठार ३ जखमी

शाखेजवळ शिवशाही बस आणि एर्टीगा कार यांचा समोरासमोर टक्कर होऊन मंगळवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. पोलादपूर शहरात पूर्व आणि पश्चिमेकडील दोन सर्व्हिस रोड आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या दोन मार्गिका यावर येण्यासाठी सर्वच वाहनचालकांचा गोंधळ अन् तारांबळ उडत असून यामुळे शहरातील प्रवेशद्वारावरच मृत्यूचे सावट तयार झाले आहे.

खेड तालुक्यातील जामगे येथे गणेशोत्सव जादा गाडीतील प्रवासी सोडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा शिवशाही गाडीचा चालक प्रकाश अर्जुन तरडे हा त्याच्या ताब्यातील खेड ते ठाणे ही रिकामी झालेली शिवशाही बस क्रमांक (एमएच ०९ इएम ३५३०) घेऊन ठाणेच्या दिशेने जात असताना मुंबईच्या दिशेने कोकणातील साखरपा येथील एर्टिगा कारला समोरासमोर ठोकर बसून अपघात झाल्याने एर्टिगा कार (एमएच ०५सीव्ही ३२९९) घेऊन जाणारे चालक किरण घागे (वय २८, घाटकोपर) आणि त्यांच्या शेजारच्या सीटवर बसलेले अंबरनाथ येथील जयवंत सावंत (वय ६० वर्षे) यांना जोरदार मार बसला. यावेळी जयवंत सावंत यांचा जागीच मृत्यू झाला तर चालक घागे याचा प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारादरम्यान कामोठे येथे रवाना केल्यानंतर महाडदरम्यान मृत्यू झाला. या अपघातातील एर्टिगा कारमधील अन्य तिघे अंबरनाथ येथील गिरीश सावंत (वय ३४) आणि जयश्री सावंत (वय ५६) आणि बदलापूर येथील अमित भीतळे (वय ३०) हे तिघे जखमी झाल्याने कामोठे येथील महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालयात दाखल करण्यासाठी रवाना केले.

पोलादपूर शहरातील अंडरपास असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरी मुंबईकडून प्रवेश करणाऱ्या वाहनांना पुर्वेकडील सर्व्हिसरोडवरून मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी पश्चिमेकडे असलेल्या मुंबईच्या मार्गिकेकडे जाताना क्रॉसिंगची सुविधा नसल्याने वेगवान वाहनांचे नेहमीच अपघात घडू शकणार असल्याने याठिकाणी सिग्नल तसेच क्रॉसिंगची सोय उभारण्याची गरज निर्माण झाली आहे.

## विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने मानले मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आभार

पाठिंबा दिला होता ते सर्व आमदार, लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे व संघटनांचे अध्यक्ष आणि हा ठराव मांडण्यासाठी पुढाकार घेणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशा सर्वांचे लेखी पत्र देऊन समितीकडून आभार मानण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, जे. डी. तांडेल, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, गुलाब वझे, पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, माजी नगरसेविका विद्या गायकवाड, विजय गायकर आदी समितीच्या कार्यकर्त्यांनी भेट घेत आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे अधिवेशनात मंजूर ठरावाला केंद्र सरकारने मंजुरी देऊन नामकरणावर शिक्कामोर्तब करावे यासाठी पाठपुरावा करण्याची विनंती यावेळी करण्यात आली.

## सिडकोतर्फे भूखंड विक्रीची योजना

नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देताना या योजनांची घोषणा करून डॉ. संजय मुखर्जी यांनी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शहर असलेल्या नवी मुंबईत नागरिक, व्यापारी आणि विकासक यांना त्यांची घरे, कार्यालये, व्यावसायिक गाळ्यांची मालकी मिळण्याचा मार्ग मोकळा केला आहे

महागृहनिर्माण योजने अंतर्गत नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील सिडकोच्या गृहसंकुलांतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परवडणाऱ्या दरातील या ४,१५८ घरांपैकी ४०४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्ग आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि उर्वरित ३,७५४ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी नवीन उत्पन्न मर्यादा रू. ६,००,००० तर अनुदानाची रक्कम रू. २,५०,००० निश्चित करण्यात आली आहे. नवी मुंबईतील विकसित नोडमध्ये आणि मोक्याच्या ठिकाणी सदर घरे असलेली गृहसंकुले वसलेली आहेत. या गृहसंकुलांना रस्ते, रेल्वे आणि सिडकोच्या मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेली आहे. आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या या गृहसंकुलांच्या परिसरात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये इ. सर्व सामाजिक सुविधाही उपलब्ध आहेत.

इतर योजनांतर्गत सिडकोच्या खारघर, तळोजा, द्रोणागिरी, कळंबोली, खारघर आणि घणसोली गृहसंकुलातील एकूण २४५ वाणिज्यिक गाळे विक्रीकरिता उपलब्ध आहेत. तसेच नेरूळ रेल्वे स्थानक संकुल आणि जुईनगर स्थानक संकुल येथील प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण ६ कार्यालये (कमर्शिअल प्रीमाईसेस) विक्रीकरिता उपलब्ध आहेत. त्याचबरोबर तारांकीत हॉटेलसाठी १, निवासी वापरासाठी ६४ तर निवासी तथा वाणिज्यिक वापरासाठी ५ भूखंड विक्रीकरीता उपलब्ध आहेत.

उपरोक्त योजनांच्या सविस्तर माहितीकरिता https://www.cidco.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून अर्ज नोंदणीपासून ते सोडती पर्यंतच्या सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन प्रक्रियेद्वारे पार पडणार आहेत. योजनांसंबंधी सविस्तर माहिती जाणून घेण्याकरिता अर्जदारांनी या संकेतस्थळास भेट द्यावी.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## भात पिकावरील खोड किडा नियंत्रणाबाबत कृषी अधिकाऱ्यांची उसडी-जोसरांजण आमली गावाला भेट



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रोहा कृषी विज्ञान केंद्राचे कृषि विज्ञानवेत्ता जीवन आरेकर, मुरुड तालुका कृषि अधिकारी मनीषा भुजबळ, मंडळ कृषि अधिकारी अहिरे व क्षेत्रिय कर्मचारी यांनी मुरुड तालुक्यातील उसडी, जोसरांजण, तिसले, तळवली, आमली व खतीबखार येथील विविध भात पिकांच्या प्रक्षेत्रास शेतक–यांसमवेत भेट देऊन पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करुन सल्ला दिला.

तालुक्यात सर्वसाधारणपणे सर्वत्र पाऊसमान थांबलेला असून भात खाचरातील पाण्याची पातळी कमी झाल्याचे दिसून येत आहे. एक–दोन तुरळक ठिकाणी खोडकिडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीखाली अल्पसा दिसून आला असून उपस्थित शेतकरी बांधवांनी बांधांवरील गवत काढून बांध स्वच्छ करावेत व खोडकिडीच्या नियंत्रणसाठी पावसाने सध्या उघडीप दिल्याने क्विनॉलफॉस २५ टक्के, प्रवाही २६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तात्काळ फवारणी करण्याचे आवाहन केले आहे. त्याच प्रमाणे बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी १५ दिवसाच्या अंतराने १० लिटर पाण्यात कार्बनडेन्झीम १० टक्के डब्ल्यु. पो. १० ग्रॅम फवारावे.असे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले.यावेळी भातपीकावर प्रादुर्भाव होऊ नये यासाठी भात कीड नियंत्रण बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# प्रेयसीने लग्नाला नकार दिल्याने तरुणाने स्वत:ला पेटवले

## नातेवाईक व ग्रामस्थांचा शव घेण्यास नकार
## सरकारी दवाखाना परिसरात तणावग्रस्त वातावरण





**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

प्रेयसीने लग्नाला नकार दिल्याने, पालीतील मधल्या आळीतील इमारतीमध्ये एका तरुणाने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केली आहे. ही घटना सोमवारी (ता.२९) घडली. दोषींवर कारवाई होईपर्यंत नातेवाईक व ग्रामस्थांनी शव घेण्यास नकार दिला. त्यामुळे रात्री व मंगळवारी सकाळी देखील पाली प्राथमिक आरोग्य केंद्राबाहेर तणाव निर्माण झाला होता.

प्रणय केशव बडे (वय २४) असे या तरुणाचे नाव असून तो रोहा तालुक्यातील आंबेघर येथील रहिवासी आहे. प्रणय विज्ञान पदवीधर होता. पालीतील प्रेयसीने लग्नास नकार दिल्याने तिच्या घरासमोर प्रणयने अंगावर रॉकेल ओतून स्वतःला पेटवून घेतले. त्यानंतर स्थानिकांनी पोलिसांना याबाबत माहिती दिल्यावर प्रणयला पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले. यानंतर प्रणयचे नातेवाईक व ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर मोठी गर्दी केली. प्रणयच्या मृत्यूला कारणीभूत असणा–यांवर कारवाई करण्याची मागणी केली आणि त्याशिवाय शव ताब्यात घेणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे पाली प्राथमिक आरोग्य केंद्राबाहेर तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी तणावग्रस्त परिस्थिति योग्य रीतीने हाताळली. याबाबत पाली पोलीस स्थानकात आत्महत्तेस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक अजित साबळे हे करीत आहेत.

# ट्रेलरने दिली कारला धडक, कार आदळली टेम्पोवर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डेरवली गाव जुना पुणे मुंबई हायवेवर ट्रेलरने मारुती सुझुकी अल्टो कारला पाठीमागून धडक दिली. यावेळी सदरची कार टेम्पोवर आदळल्याने या अपघातात एक जण जखमी झाला आहे. ट्रेलर चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खोपोली येथील निखिल नंदकुमार गुरव हे व त्यांचा आतेभाऊ सौरभ राऊळ हे मारुती सुझुकी अल्टो कार क्रमांक एमएच ४६ ए एक्स ०५८६ घेऊन पनवेल येथे येत होते. डेरवली गाव येथे आले असता पाठीमागून येणाऱ्या ट्रेलर क्रमांक एम एच ४६ बीएफ ९३ ६७ ने त्यांच्या कारला पाठीमागून ठोकर मारली. यावेळी कार समोर चालणाऱ्या टेम्पो क्रमांक एम एच ४३ बीजी ६७९५ यावर जाऊन आदळून अपघात झाला. ट्रेलर चालकाला याबाबत विचारले असता त्याने कार मधील सौरभ राऊळ याला धक्काबुक्की व शिवीगाळ केली. यात सौरभ जखमी झाला आहे. ट्रेलर चालक पळून गेला असून या अपघातात कारचे नुकसान झाले आहे.

# गणेशोत्सवा निमित्ताने प्रशासनाकडून गणेश मंडळे व विसर्जन ठिकाणांची पाहणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गणपती उत्सव केवळ एक दिवसावर येऊन ठेपला आहे त्या अनुषंगाने माथेरान येथे गणेशोस्तव सुरक्षित शांततेत पार पाडण्यासाठी शासन स्तरावर योग्य ती काळजी घेतली जात आहे.

शांतता कमिटी, स्थानिक सार्वजनिक गणेश मंडळे, गणपती धारक यांची याबाबत महिन्या भरापुर्वीच येथील तहसील कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये येणारा गणेशोत्सव सण साजरा करताना कोणत्याही प्रकारे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत उपस्थित गणपती धारक व सार्वजनिक गणेश मंडळे यांच्याशी सविस्तरपणे चर्चा करण्यात आली होती.



मागील काही दिवसांपासून नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे–शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना सूचना देऊन गावातील सर्वच पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावर ब्लिचिंग पावडर टाकून रस्ते चकाचक केले आहेत त्यामुळे गणेश भक्तांना चालणे खूपच सोयीस्कर बनले आहे.

आज दि.३० रोजी माथेरानचे प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक शेखर लव्हे, अधीक्षक दीक्षांत देशपांडे, पाणी पुरवठा विभागाच्या अपर्णा कंटे यांनी आज माथेरान येथील इंदिरा गांधी नगर येथील विक्रात युवक मंडळ व मायरा पॉईंट येथील हरिसन स्प्रिंग येथील पाण्याच्या कुंभातील गणेश विसर्जन ठिकाणी तसेच संत रोहिदास येथील बाळ गोपाळ गणेश मंडळ, व सार्वजनिक वाचनालय, व वॉकर टँक( बालदी) या विसर्जन ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीची पूर्व पाहणी करून संबंधित गणेश मंडळांना सूचना केल्या व गणेश भक्तांनी केलेल्या सुयोग्य प्रकारे कामांबाबत समस्त अधिकारी वर्गाने समाधान व्यक्त केले.

# उदयनराजेंच्या साताऱ्यात गणेशोत्सावात डीजे वाजणार

**सातारा । वृत्तसंस्था**

गणेशोत्सवात डीजे वाजणार की नाही? याबाबत अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला मंगळवारी पूर्णविराम मिळाला. जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी ध्वनिमर्यादेचे निर्बंध कायम ठेवत ३१ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत डीजेला परवानगी देत असल्याचे जाहीर केले आहे. सातारा शहरात सात वर्षांपूर्वी घडलेल्या एका दुर्घटनेनंतर डीजेवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली. याचा डीजेचालकांना मोठा आर्थिक फटका बसला. त्यामुळे यंदाच्या उत्सवात तरी डीजेला परवानगी देण्यात यावी, अशी मागणी डीजे चालकांकडून केली जात होती. खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी देखील ध्वनिमर्यादेचे निर्बंध घालून डीजेला परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. मात्र, पोलीस प्रशासनाने काही झालं तरी डीजेला परवानगी नाही, अशी भूमिका घेतल्याने गणेशोत्सवात डीजे दणाणणार की नाही? याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.


मा.गोडसे मॅडम कोर्ट

**ॲड.अजित धनराज म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१२७०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१५/१०/२०२२

१) श्री.दिलीप सिताराम पाटील
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी
२) कै.प्रल्हाद सिताराम पाटील मयत तर्फे वारस
२/१) श्रीमती.कविता प्रल्हाद पाटील
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२/२) श्री.प्रतिक प्रल्हाद पाटील
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
२/३) कु.प्रज्ञा प्रल्हाद पाटील
वय : २९ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांची आत्या व २/१ यांची आत्ये सासू व अर्जदार नं.२/२ ते २/३ यांची आजी कै.अनुबाई रामदास म्हात्रे ह्या दि.०५/०१/१९८१ रोजी मौजे : मु.पो. कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांचे भाऊ कै.सिताराम नारायण पाटील हे दि.०७/०४/२००३ रोजी त्यांच्या राहत्या घरी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांना त्यांच्या वडिलोपार्जित वारसाहक्काने मिळालेली मिळकत व त्यांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १९३ | १६ | १ | ०–१४–९ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड हा कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर मिळकती मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंड देण्यात आले आहे.

| गाव | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नावडे | १०१ | ४५ | १५० चौ.मी. |

सदर वर नमूद मिळकतीत कै.अनुबाई रामदास म्हात्रे त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे. सदरची मिळकत ही कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांना त्यांच्या वडिलांकडून मिळालेली मिळकत आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.अनुबाई रामदास म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.३०/०८/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# माणगांवात विष्णुबूवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र कार्यालयाचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राच्या माणगांव, जिल्हा रायगड येथील कार्यालयाचे सोमवार, २९ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी १०. ०० वा. उद्घाटन झाले. या वेळी कार्यालयाच्या फलकाचे अनावरण आणि विष्णुबुवांच्या प्रतिमेचे पूजन पूज्य सनातन स्वामी ( तिकोना पेठ, ता. मावळ, जिल्हा – पुणे ) यांनी केले. तसेच यावेळी विष्णुबुवांनी लिहिलेले विविध ग्रंथ व त्यांचे वर लिहिलेली अन्य लेखकांची पुस्तके व पीएचडी. चे प्रबंध मांडण्यात आले होते. १९ व्या शतकातील थोर समाजसुधारक, द्रष्टा संन्यासी हिंदुधर्मरक्षक व प्रचारक श्री. विष्णुबुवा ब्रम्हचारी ( सन १८२५ – १८७१) यांचे कार्य आणि विचार लोकांपर्यंत पोचविण्यासाठी हे केंद्र प्रयत्नशिल आहे.






या कार्यक्रमासाठी माणगांवचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, शिवसेना नेते ॲड.राजीव साबळे, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणी पूरवठा सभापती राजेश मेहता, स्वच्छता व आरोग्य सभापती अजित तार्लेकर, नगरसेवक कपील गायकवाड, हेमंत शेट तसेच रा. स्व. संघाचे गाणेकर सर, न्यासाचे विश्वस्त – उपाध्यक्ष सुनील जगताप, खजिनदार नितीन बामगुडे, सदस्या सौ. प्रतिभा पोळेकर आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

माणगांव येथील प्रतिष्ठित नागरिक तथा उद्योजक नितीन बामगुडे या न्यासाचे खजिनदार आहेत. त्यांनी स्वतःच्या मालकीची जागा कार्यालयाला वापरण्यासाठी दिली असुन विष्णुबुवांच्या कार्यात सहभागी होण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांनी, विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र, २७७३ / १ – २, वंदन अपार्टमेंट, कचेरी रोड, माणगांव पिन – ४०२१०४ या ठिकाणी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन केंद्राच्या मार्फत केले आहे.

# कशेडी घाटातील चोळई येथे चोरी-मोटार सायकल, मोबाईल आणि रोख रक्कम लंपास

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटातून तीव्र उतारालगत असलेल्या सडवली ग्रामपंचायत हद्दीतील लोकवस्तीमध्ये सोमवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी एका घराबाहेरील मोटारसायकल, घरातील मोबाईल व रोख रक्कम तसेच बॅंकेचे पासबुक, आधारकार्ड आदी कागदपत्रांचीही चोरी केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील बांधकाम व्यवसाय करणारे रोहिदास सदाशिव मोहिते यांच्या घरासमोरील हिरो होण्डा पॅशन प्रो मोटारसायकल लालकाळ्या रंगाची सुमारे २५ हजार रूपये किंमतीची तसेच ५०० रूपयांच्या आठ नोटा असे ४ हजार रूपये, महाड अर्बन बॅंकेचे पासबुक, आधारकार्ड आदी कागदपत्रे, एमआय कंपनीचा ८ हजार रूपये किंमतीचा मोबाईल फोन व एअरटेल सीम, असा ऐवज कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वत:च्या फायद्याकरीता घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा उचकटून आत प्रवेश करून चोरून नेला.

सोमवारी पहाटे घडलेल्या या चोरीप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक प्रशांत नटे अधिक तपास करीत आहेत.

# बाप्पाच्या स्वागतासाठी उरणच्या बाजारात लाखोंची उलाढाल

**दै.रायगड नगरी । उरण**

यावर्षी बाप्पाचे आगमन लवकरच असल्याने व गणेशोत्सवात निर्बंध मुक्त होत असल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.आपल्या लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी उरणच्या बाजारामध्ये ग्राहकांनी खरेदीसाठी एकच गर्दी केली होती.



उरण शहरातील एकमेव बाजारपेठ असल्याने व गणेशोत्सव बुधवार दि.३१ ऑगस्ट रोजी येत असल्याने फुले, हार, प्लास्टिक फुले, फ्लॉवर पट्टा, मुकूट, कंठी, आकर्षक विद्युत माळा खरेदी करण्यासाठी बाजारात एकच झुंबड उडाली होती.तसेच मकर सजावटीसाठी लागणारे साहित्य, किरणा सामान, विविध प्रकारची मिठाई, फळे खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी गर्दी केली होती. काही गणेश भक्त हे पर्यावरण मुक्त करण्याच्या उद्देशाने फुल झाडे सह इतर विविध प्रकारची आकर्षक झाडे खरेदी करण्यासाठी रस्त्याजवळील नर्सरीमध्ये गर्दी करत होते. यावेळी ग्राहकांना सेवा देताना व्यापारी वर्गाला तारेवरची कसरत करावी लागत होती.

उरण बाजारात आलेल्या ग्राहकांमुळे, नागरीकांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. यावेळी नागरीकांना, ग्राहकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. यांचे गांभीर्य ओळखून उरण वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड यांनी जातीने लक्ष घालून आपल्या कर्मचारी वर्गाच्या माध्यमातून ग्राहकांना सुचना देण्याचे काम केले.तसेच जे वाहन चालक वाहतूक पोलीस यंत्रणेच्या नियमांचे उल्लंघन करत होते त्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : वशेणी, ता.उरण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या भूखंडाचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकाकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे :–

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : वशेणी, ता.उरण, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्र. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.मोहन रामा ठाकूर व इतर | ८२ | १/ब/२ | ०–२२–००<br>०–००–००<br>एकूण ०–२२–०० | ७.०० |

वरील मिळकत ही श्री.मोहन रामा ठाकूर व इतर यांच्या मालकीची असून ती जमीन माझे अशिल योग्य ती विक्री परवानगी मिळवून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येवून सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

उरण
दि.३०/०८/२०२२

**सही/–**
**ॲड.प्रसाद एन. पाटील**
**पत्ता : ४०३, ए–विंग, तुलसी सोनाटा बिल्डींग, चॅनल उपवन बिल्डींग समोर, साईनगर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७०२०८२६६९**



पांडे साहेब कोर्ट

**अर्जदाराचे वकील : ॲड.मदन गोवारी**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अ.क्र.९४५/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२८/०९/२०२२

श्रीमती.प्रिती जतन विश्वकर्मा
वय : ३२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.सरपंच/ग्रामसेवक सो,
ग्रामपंचायत करंजाडे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.जतन राजानाथ विश्वकर्मा यांचा मृत्यू दि.२५/०४/२०२१ रोजी मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे आणि अर्जदार यांनी आपले पती कै.जतन राजानाथ विश्वकर्मा यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.जतन राजानाथ विश्वकर्मा, वर नमूद ठिकाणी मयत झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर या जा–हीर नोटीसच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.३० माहे ०८/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

# संक्षिप्त...

## कर्जत मधील गणेश घाटाची नगराध्यक्ष यांच्याकडून पाहणी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर गणेश घाट नंबर एक व घाट नंबर दोन या दोन घाटांची नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्याकडून पाहणी करण्यात आली आहे.

उद्या ३१ ऑगस्ट रोजी गणरायाचे आगमन आहे, दीड दिवसाच्या गणरायाचे दुसऱ्या दिवशी म्हणजे १ सप्टेंबर रोजी विसर्जन असल्याने कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर पाणी अडवण्यासाठी झडपा बसवण्यात आल्या आहेत, गणेशोत्सवापूर्वी कर्जत नगर परिषदेने नदीवरील सर्व घाटावरील गवत काढून साफसफाई केली आहे, घाटावर लाईटची सुविधा करण्यात आली आहे, या सगळ्या पूर्वतयारीची पाहणी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल,नगर परिषदेचे अभियंता मनिष गायकवाड,सुदाम म्हसे,सुनील लाड, उल्हास नदी स्वच्छता अभियान चे समीर सो- हनी यांनी केली. गणेश उत्सव आनंदाने साजरा व्हावा, नागरिकांची कुठलीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी, जंतुनाशक फवारणी, पावडर फवारणे, निर्मल्या टाकण्यासाठी सोय करण्याची सूचना नगराध्यक्ष जोशी यांनी संबधीत कर्मचारी वर्गाला केल्या आहेत.

## आर्या भारत भोपी हिला गोल्ड मेडल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नंदुरबार येथे झालेल्या दुसरी जम्प रोप स्पर्धा महाराष्ट्र राज्य चषक २०२२ स्पर्धेत कुमारी आर्या भारत भोपी (रिटघर) हिने या स्पर्धेमध्ये गोल्ड मेडल मिळवले आहे. याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

महाराष्ट्र राज्य चषक २०२२ ही दुसरी जम्प रोप स्पर्धा नंदुरबार येथे घेण्यात आली. या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील रिटघर गावातील आर्या भोपी हिने गोल्ड मेडल पटकावले. रायगड जिल्ह्यामधून आर्याची निवड झाली होती. आर्या हिला निलेश भोसले, अनुज भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

# मेट्रो ३ प्रकल्प पर्यावरण पूरक ठरेल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य शासन पायाभूत सुविधांना प्राधान्य देत आहे. त्याअंतर्गत मुंबईकरांसाठी नव्याने जीवन वाहिनी ठरणारा मेट्रो ३ प्रकल्प सार्वजनिक वाहतुकीची सुविधा देण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करणारा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने कुलाबा-वांद्रे-सिप्झ कॉरिडोर (एक्वा लाईन) मुंबई मेट्रो ३ च्या पहिल्या भूमिगत ट्रेन चाचणीचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सारिपुत नगर, आरे कॉलनी येथे झाला. यावेळी आमदार दिलीप लांडे, अतुल भातखळकर, जपान सरकारचे डेप्युटी कौन्सुल जनरल तोशीहिरो कानेको, मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्य शासन सर्वसामान्यांचे हित लक्षात घेऊन राज्याला प्रगतीपथावर नेणाऱ्या कामांना प्राधान्य देत आहे. मेट्रो ३ च्या पूर्णत्वानंतर सुमारे १७ लाख प्रवासी प्रवास करू शकणार असून यामुळे रस्त्यावरील सुमारे सात लाख खासगी वाहनांची वरदळ कमी होईल. याप्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याबरोबरच वायू आणि ध्वनी प्रदूषण देखील कमी होईल. तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होईल.

ज्या राज्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उत्तम असते तेथील नागरिक त्याचा वापर करतात, पर्यायाने रस्त्यावरील खाजगी वा- हतूक कमी होते असे सांगून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा सुद्धा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले. या प्रकल्पामुळे नागपूर ते मुंबईपर्यंतच्या अनेक जिल्ह्यांना लाभ होणार असून लवकरच या मार्गाच्या नागपूर-शिर्डी या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन होणार आहे, असे श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे जनहिताच्या प्रत्येक प्रकल्पासाठी राज्य सरकारच्या पाठीशी असून राज्य आणि केंद्र सरकार मिळून विविध महत्त्वाचे प्रकल्प गतीने पूर्ण करू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. मेट्रो ३ च्या यशस्वी चाचणीसाठी त्यांनी श्रीमती अश्विनी भिडे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी प्रास्ताविकाद्वारे मेट्रो ३ ची वैशिष्टे सांगून डिसेंबर २०२३ पर्यंत या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले.

## सत्ता असो अथवा नसो विकासकामांचे बाबतीत कुठेही कमी पडणार नाही : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**


गेली अनेक वर्ष राजकारण करित असताना सर्व सामान्य माणसाला केन्द्रस्तानी ठेवत,त्यांच्या पर्यन्त विकास कसा जाईल, हाच विचार माझा सारख्या कार्यकर्त्यांनी केला असल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ता नसली तरी रोहा तालुका विकासाच्या बाबतीत कुठेही कमी पडनार नाही असे ठाम वक्तव्य खा. सुनिल तटकरे यानी केले.

रोहे तालुक्यातील खांब देवकान्हे विभागातील नड़वली, तळवली, चिल्हे, धानकांन्हे, देवकान्हे, येथे विविध विकास कामांच्या भूमीपुजन व लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी धानकान्हे येथे संपन्न झालेल्या सभेत खा.सुनील तटकरे बोलत होते. यावेळी व्यासपिठावर रायगड जिल्हा राष्ट्रवादी जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटिल, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, महेंद्र पोटफोडे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, नारायण धनवी, तान- ाजी जाधव, बाबुराव बामणे, राम मरवडे, वसंत मरवडे, नरेंद्र जाधव, मनोज शिर्के, सरपंच वसंत भोईर उपसरपंच सुरज कचरे आदी मान्यवर उपस्थित होते. खा. सुनिल तटकरे पुढे म्हणाले की या विभागातील बुजुर्ग नेते मंडळींची साथ त्या काळामधे प्रमाणिकपणे मिळाली,या परिसरात दुबार भातशेती करिता त्या काळात प्रयत्न झाला. पालदाड़ पुलाची त्या काळात निर्मिती झाली.हा संबंध परिसर शैक्षणिक बाबतीत प्रगत होत आहे. गेली ७५ वर्ष या भागात अध्यात्मिक परंपरा जोप- सली जात आहे. त्यामूळे तटकरे परिवार अणि हा भाग हे एक ऋणानुबंधाचे नाते अनेक वर्ष टिकून आहे, त्यामूळे तटकरें ना कधी समस्या सांगितली अणि ते काम पुर्ण झाले नाही असे कधी झाले नाही. येथील बुजर्ग मंडळीच्या आशिर्वादाच्या पाठबलावरच हे शक्य होत असल्याचे विनम्रपणे खासदार सुनिल तटकरे यानी सांगितले.

खा.सुनील तटकरे यांचा अनेक वर्षा नंतर चा दौरा असल्याने या विभागात कार्यकर्त्याचा उस्ताह दिसून आला परिसर राष्ट्रवादीमय झाल्याचे दिसून आले. नड़वली गावातून सुरवात झालेला या दौरा ची सांगता देवकांन्हे येथे झाली धानकांन्हे ग्रामस्थांनी सर्वाना स्नेह भोजन दिले यावेळी खासदार सुनिल तटकरे यानी देखील सुरज कचरे यांच्या निवासस्थानी भोजनाचा आस्वाद घेतला.

## आयुक्त गणेश देशमुख यांची विसर्जन घाटांची पाहणी

## पनवेल महानगरपालिकेकडून गणेशोत्सवाची जय्यत तयारी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने हस्तांतरीत केलेल्या सेवा सुविधांमध्ये यावर्षी प्रथमच पनवेल महापालिकेकडे गणेश विसर्जन घाटांचे हस्तांतरण झाले आहे. या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने गणेशोत्सवापूर्वी विसर्जनाचे घाट बांधण्यापासून ते गणेश विसर्जनापर्यंची सर्व तयारी पूर्ण केली आहे. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी गणोत्सवाच्या तयारीमध्ये जातीने लक्ष घातले आहे. नुकतीच त्यांनी विसर्जन घाटांची पहाणी करून सोयी सुविधांचा आढावा घेतला.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती गेले दोन वर्षे गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला होता. मात्र यावर्षी नागरिकांचा उत्साह पाहता पालिकेने गणोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. गणेशभक्तांच्या सोयी सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग या ७ विभागांच्या माध्यमातून समन्व्य साधून गणोशोत्सवाची तयारी पूर्ण केली आहे.

यावर्षी महापालिका क्षेत्रात चारही प्रभागांमध्ये जवळपास ६१ ठिकाणी गणपती विसर्जन घाटावरती महापालिकेच्यावतीने तयारी करण्यात आली आहे. याठिकाणी मंडप, लाईट, टेबल-खुर्ची ,जनरेटर ,हॅलोजन, स्टेज, बॅरिगेटस्, क्रेन, हायड्रा, निर्माल्य कलश, लाऊड स्पीकर, लाईफ जॅकेट, तराफा या सर्वांची तयारी करण्यात आली आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गणोत्सवाचे उत्तम नियोजन केले आहे. यावर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून नोंदणीसाठी आकारले जाणारे शुल्क आकारले जाणार नाही असा महत्वाचा निर्णय आयुक्त गणेश देशमुख यांनी घेतला आहे. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांचा उत्साहही वाढला आहे.

घनकचरा आणि आरोग्य विभागाअंतर्गत विसर्जन घाटावर साफसफाईची आणि निर्माल्य कलश ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी विविध घाटांवर पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. गणेश विसर्जनावेळी त्या त्या ठिकाणी पथके तैनात करण्यात येणार असुन एका अधिकाऱ्याबरोबर ४ व्यक्ती असणार आहेत. यामध्ये सफाई कामगार, स्वच्छता निरीक्षक, प्रभारी स्वच्छ्ता परीक्षक, मुकादम अशी एक टीम असेल. प्रत्येक टीम ही विसर्जनाच्या मुख्य तारखांना दुपारी २ वाजल्यापासुन ते शेवटच्या मूर्तीचे विसर्जन होईपर्यंत घाटावर उपस्थित राहण्याबाबत त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

## घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील चिंध्रण या गावी एका घरात घरी फोडी करून जवळपास ९३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या गुन्हेगारास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे.

येथे राहणारे पांडुरंग कडू यांच्या घराच्या मागील दरवाजाचा कडी कोयंडा कोणत्यातरी हत्याराने तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून घरातील बेडरूम मधील कपाटाच्या लॉकर मध्ये ठेवलेले जवळपास ९३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोवीस ठाण्यात करण्यात आली होती त्या तक्रारी नुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक रवींद्र दौडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक खेडकर, सहा.पोलीस निरिक्षक अविनाश पाळदे, पो. हवा सूर्यवंशी, पोना मोकल, पोशी भोये, खताळ, जयदीप पवार, सचिन होळकर आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराच्या आधारे तसेच तांत्रिक तपासाद्वारे आरोपी उदय कडू (३२) याची माहिती मिळाली त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन गुन्ह्यातील मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून गणेशोत्सवाच्या शुभेच्छा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणरायाच्या कृपेने गेल्या दोन वर्षातले कोरोना संकटाचे मळभही आता दूर झाले आहेत. त्यामुळे यंदा आपण गणरायाचे उत्साहात, जल्लोषात आणि निर्बंधमुक्त वातावरणात स्वागत करत आहोत. गणरायाचे आगमन आपल्या सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि समाधान घेऊन येवो याशब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला शुभेच्छा दिल्या आहेत.

'लाडक्या गणरायाचे स्वागत करताना, महाराष्ट्राच्या विकासाचा पुनश्च श्रीगणेशा करण्याचा संकल्प करूया. त्यासाठी आपण सर्व एकजुटीने आणि कोणत्याही आव्हानाची तमा न बाळगता प्रयत्न करूया,' असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. मुख्यमंत्री शुभेच्छा संदेशात म्हणतात, उत्सव साजरा करताना सामाजिक भान जपणं देखील आवश्यक आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण यासारख्या विषयांवर सार्वजनिक गणेश मंडळांनी भर देऊन जनजागृती करावी. आपल्या सर्वांच्या साक्षीनं महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा दृढ संकल्प केला असून त्याच्यापूर्तीसाठी आपल्या मनातलं आमचं सरकार सर्वतोपरी प्रयत्नशील आहे, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्याच्या विकासाचं मनोरथ पूर्णत्वास जाण्यासाठी आपली साथही हवी आहे. कोरोना संकटामुळं मंदावलेली विकासाची गती आपल्याला पुन्हा गाठायची आहे. त्यासाठी कितीही आव्हानं येऊ देत, त्यांची तमा करायची नाही, अशी हिंमत बाळगुया. लाडक्या गणरायाचं स्वागत करताना, महाराष्ट्राच्या विकासाचा पुनश्च: श्रीगणेशा करण्याचा संकल्प पूर्णत्वास जावा यासाठी गणरायाला साकडं घालतो, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

